जनसंपर्क कक्ष
0 5 APR 2026 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्या परिषदेच्या बैठकीत विविध अभ्यासक्रमांना परवानगी

## ३६ विविध विषयावर चर्चेने अंतिम निर्णय; शिवाजी विद्यापीठात बैठक संपन्न

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या शनिवारी झालेल्या बैठकीत महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांना परवानगी देण्यात आली.

यामध्ये बीए, बी.कॉम, एमए, एमएस्सी–केमेस्ट अशा विविध अभ्यासक्रमांना परवानगी देण्यात आली. बैठकीत ३६ विषयांवर चर्चा झाली. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. विज्ञान शाखेच्या ओपन इलेक्टिव्ह विषयावर चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी प्रॅक्टिकल व थिअरी यापैकी कोणता पर्याय निवडावा, याची मुभा त्यांना देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.



यावेळी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत बाडे महाविद्यालय, पुनाळ व दिंडे महाविद्यालय, बीडशेड यांना त्रुटीमुळे परीक्षा केंद्र न देण्याचा निर्णय झाला. पुढील वर्षी कमिटीच्या तपासणीनंतर केंद्र दिले जाणार आहे. काही महाविद्यालयांना निरंतर संलग्नीकरणाचे प्रस्ताव नाकारण्यात आले. शाहू कॉलेज (एमएस्सी–केमेस्ट्री), श्रीपतराव चौगुले आर्टस अँड कॉमर्स कॉलेज (बी.व्होक), सायबरमधील वुमेन्स कॉलेज ऑफ नॉन कव्हेंशनल, संजीवन ग्रुप पन्हाळा येथील काही कोर्स व आशा कॉलेज बंद करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. प्रयोगशाळा संशोधन केंद्र मंजुरीसाठी समिती गठीत करण्याचा निर्णय झाला. कराड येथील महिला महाविद्यालय को–एज्युकेशनला मान्यता देण्यात आली. संलग्नीकरण व नूतनीकरणासाठी कमिटी नेमण्याचा निर्णय झाला. यावेळी डॉ. मंजिरी मोरे–देसाई, डॉ. सुषमा नायकवडी, डॉ. वर्षा मैंदर्गी, सुनील चव्हाण उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 APR 2026
तरुण भारत

# कुलगुरू पदासाठी मुलाखती पूर्ण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची कुलगुरूपदाची निवड प्रक्रिया गेल्या अनेक दिवसापासून सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून शुक्रवारपासुन सुरू असलेल्या मुलाखतींची प्रक्रिया काल पूर्ण झाली. यानंतर आता अंतिम पाच जणांची नावे निश्चित झाली असून ती नावे कुलपती कार्यालयाकडे सादर केली जाणार आहेत. यातून एका उमेदवाराची कुलगुरू पदासाठी निवड केली जाणार आहे. मुलाखतींचा कार्यक्रम मुंबई येथे झाला. शुक्रवार दि. ३ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती पाटील, माजी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रसायन शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. चव्हाण, डॉ. एस. एस. कोळेकर तसेच मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचीही मुलाखत झाली आहे. शनिवारी उर्वरीत उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण झाल्या. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी ११५ अर्ज प्राप्त झाले होते. याची छाननी होऊन २२ उमदेवारांची मुलाखतीसाठी निवड केली होती. दोन दिवस ही निवड प्रक्रिया चालली. आता मुलाखतीच्या प्रक्रियेतून पाच उमेदवारांची नावे कुलपती कार्यालयाकडे सादर होणार आहेत. यातून एका उमेदवाराची कुलगुरू म्हणून निवड करण्यात येणार आहे. नवीन कुलगुरू कोण होणार याकडे सर्व शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

0 5 APR 2026
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ओपन इलेक्टिव्हमध्ये 'प्रॅक्टिकल किंवा थिअरी'चा पर्याय

## विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या विद्या परिषदेचा मोठा दिलासा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विज्ञान शाखेतील ओपन इलेक्टिव्ह विषयाबाबत विद्यार्थ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत शनिवारी घेण्यात आला. या विद्यार्थ्यांना मुख्य विषयांसह इतर विषयांसाठी 'प्रॅक्टिकल' अथवा 'थिअरी' यापैकी कोणताही पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आली आहे. यासाठी प्राचार्य संघटनांनी आंदोलन करून बहिष्कार टाकला होता.

शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सभागृहात शनिवारी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या बैठकीत एकूण ४० विषयांवर चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात आले. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत बाडे महाविद्यालय (पुनाळ) आणि दिंडे महाविद्यालय (बीडशेड) या दोन महाविद्यालयांचे परीक्षा केंद्र त्रुटींमुळे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील वर्षी तपासणीनंतर पुन्हा केंद्र सुरू करण्याबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे. यावेळी अनेक महाविद्यालयांचे संलग्नीकरण प्रस्तावही फेटाळण्यात आले. प्रयोगशाळा संशोधन केंद्र मंजुरीसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, कराड येथील महिला महाविद्यालयाला सहशिक्षण (को-एज्युकेशन) मान्यता देण्यात आली. तसेच संलग्नीकरण व नूतनीकरणासाठीही समिती नेमण्याचा निर्णय झाला. संलग्नीकरणाच्या शुल्कवाढीचा दंडक तीन वर्षांचा होता. तो सहा वर्षांसाठी २० टक्के आकारण्याचाही निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

**४०**
विषयांवर बैठकीत चर्चा करून अंतिम निर्णय घेतले.

### यांचे अभ्यासक्रम केले बंद

शाहू कॉलेज (एमएस्सी केमिस्ट्री), श्रीपतराव चौगुले आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज (बी.व्होक), सायबरमधील वुमेन्स कॉलेज ऑफ नॉन-कन्वेन्शनल, संजीवन ग्रुप पन्हाळा येथील काही अभ्यासक्रम तसेच आशा कॉलेज बंद करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

### संलग्नीकरण फी संदर्भात समिती

१ एआयसीटीईअंतर्गत बीबीए आणि बीसीए अभ्यासक्रमांसाठी एमसीए तसेच नेट ही शैक्षणिक पात्रता आवश्यक ठरवली आहे. तसेच एका वर्षासाठी नेमणुका करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

२ याशिवाय संलग्नीकरण फी संदर्भात नव्याने समिती गठीत करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
0 5 APR 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कुलगुरू'साठी मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. शुक्रवारी आणि शनिवारी कुलगुरुपदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुंबईत मुलाखती घेण्यात आल्या. आता समितीकडून अंतिम नावांची यादी तयार करून ती कुलपती तथा राज्यपालांकडे सुपूर्द केली जाणार आहे. आठवडाभरात विद्यापीठाला नवीन कुलगुरू मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कुलगुरुपदासाठी एकूण ११५ अर्ज प्राप्त झाले होते. या अर्जांची छाननी करून शोध समितीने २२ उमेदवारांची नावे मुलाखतीसाठी निश्चित केली होती. राजभवनाकडून या २२ उमेदवारांच्या मुंबईत मुलाखती घेण्यात आल्या. दोन दिवस चाललेल्या या मुलाखतींनंतर 'कुलगुरू शोध निवड समिती'कडून पाच नावे राज्यपाल कार्यालयाकडे दिली जातील. त्यानंतर राज्यपाल या पाचही उमेदवारांच्या वैयक्तिक मुलाखती घेऊन त्यातून एकाची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 APR 2026
सकाळ

# कुलगुरुपदासाठी आठ जणांच्या मुलाखती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी मुंबईत आज आठ जणांच्या मुलाखती झाल्या. माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह पंजाब, अमरावती, नांदेड व पुण्यातील उमेदवारांच्या आज मुलाखती घेण्यात आल्या. कुलगुरू शोध निवड समितीकडून कुलगुरुपदासाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. या मुलाखतींसाठी कोईम्बतूर येथील भरतियार विद्यापीठाचे गणित विभागाचे प्रा. एस. सरवनन यांची नोडल ऑफीसर म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (ता. ३) प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. आर. के. कामत, डॉ. पी. एस. पाटील, आर. जी. सोनकवडे आणि डॉ. संजय चव्हाण यांच्या मुलाखती झाल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 5 APR 2026 पुढारी



कोल्हापूर : पुढारी भवनमध्ये आयोजित डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन कामकाज आढावा बैठकप्रसंगी दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. समवेत डॉ. व्ही. एन. शिंदे, अनिल पाटील, सतीश पडळकर, रणजित यादव, डॉ. शिवाजी जाधव, चंद्रकांत जितकर, सुनील नागराळे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण व्हावे

## प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी; 'पुढारी' भवनमध्ये अध्यासन कामासंदर्भात बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन पूर्णपणे मीडियाला वाहिलेले आहे. अध्यासनात येणाऱ्या काळात नवीन कोर्सेससह नावीन्यपूर्ण गोष्टी सुरू होणार आहेत, त्या अनुषंगाने अध्यासनाची इमारत सर्व सोयी-सुविधांनी परिपूर्ण व पर्यावरणपूरक करावी, अशी सूचना प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केली.

पुढारी भवनमध्ये शनिवारी सायंकाळी डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या कामाबाबत दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्या प्रमुख उपस्थित झाली. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दोन वर्षांत झालेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. यावेळी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी ऑडिटोरियममध्ये इतर सुविधांबरोबरच यूपीएस व जनरेटची सुविधा करण्यात यावी. इमारतीला फेन्सिग करून घ्यावे. परिसरात विविध ठिकाणी सीसीटीव्ही लावून घ्यावेत, अशा सूचना केल्या.

डॉ. जाधव यांनी मे महिन्यात उद्घाटन करण्याच्या अनुषंगाने उर्वरित कामांधील सिमेंट रस्ता, पार्किंग सुविधा, पेंट्री व कॅफेट एरिया करावा, अशा सूचना दिल्या. तसेच अध्यासनामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपयोगी असे राष्ट्रीय स्तरावरील नवीन कोर्सेस सुरू करण्यास सांगितले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी अध्यासनामध्ये ग्राफिक डिझाईन, व्हिडीओ एडिटिंग, इव्हेंट मॅनेजमेंटसारखे नवीन कोर्सेस सुरू करण्याची सूचना केली. यावेळी दै. 'पुढारी'चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आकाशवाणीचे निवृत्त अधिकारी सतीश पडळकर, उपकुलसचिव रणजित यादव, निवृत्त उद्यान अधीक्षक चंद्रकांत जितकर, कंत्राटदार सुनील नागराळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 APR 2026
पुण्यनगरी

# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (नवी दिल्ली) यांच्या वतीने हैदराबाद येथे झालेल्या आठव्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

हैदराबाद येथील मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठात दि. १ व २ एप्रिल या कालावधीत राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा २०२५-२६ पार पडली. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा एकूण १५ सदस्यांचा संघ सहभागी झाला. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सईद हसन यांच्या हस्ते तृतीय क्रमांकासाठीचा चषक आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

संघात अभय हावळ, मुनाफ खान, सूरज कांबळे, स्नेहल चव्हाण, किरण भाकरे, तनुजा कांबळे, मृण्मयी पांचाळ, सुधांशू तांबे, विपश्यना कामत आणि निहाल रुकडीकर यांचा समावेश होता. तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ऋषीकेश देशमाने व सुमंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. वादक साथीदार म्हणून देशमाने, कौस्तुभ शिंदे, प्रेम भोसले यांनी, तर संघव्यवस्थापक म्हणून देवेंद्र श्रीमंत शिंदे आणि सुरेखा आडके यांनी काम पाहिले. विजेत्या संघाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डॉ. सावलीराम घाणे यांनी अभिनंदन केले.

0 5 APR 2026 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कनोईंग, कयाकिंग स्पर्धांचा आजपासून थरार

## सांगलीच्या कृष्णा नदी घाटात होणार स्पर्धा

**कोल्हापूर :** भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांना सांगली येथे आजपासून प्रारंभ होत आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी ९ वाजता कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदी घाट येथील रॉयल बोट क्लब येथे स्पर्धेचे उद्‌घाटन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे उपस्थित राहणार असून सन्माननीय अतिथी म्हणून सांगलीचे आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, महापौर धीरज सूर्यवंशी, जिल्हाधिकारी मैनक घोष, सांगली–मिरज–कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त सत्यम गांधी, प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचीही उपसिथती असणार आहे.

### ४० विद्यापिठांमधून खेळाडुंचा सहभाग

**स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्यक्ष स्पर्धेला सकाळी सात वाजता सुरू होणार आहे. स्पर्धेत कयाकिंग मध्ये के वन, के टू, के फोर तसेच कनोईंगमध्ये सी वन, सी टू असे २०० मीटर, ५०० मीटर व १००० मीटर या जलक्रीडा प्रकारात स्पर्धा होतील. स्पर्धेचा लाभ क्रीडाप्रेमींनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले आहे.**



0 5 APR 2026

ललकार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अखिल भारतीय कनोईंग व कयाकिंग स्पर्धांना सांगलीत आजपासून प्रारंभ

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याहस्ते उद्घाटन




। ललकार वृत्त ।

सांगली, दि. ४ (प्रतिनिधी) - भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांना सांगली येथे आजपासून (रविवार, दि. ५) प्रारंभ होत आहे. महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उद्या सकाळी ९ वाजता कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदी घाट येथील रॉयल बोट क्लब येथे स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे उपस्थित राहणार असून सन्माननीय अतिथी म्हणून सांगलीचे आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, महापौर धीरज सूर्यवंशी, जिल्हाधिकारी मैनक घोष, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त सत्यम गांधी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचीही यावेळी उपस्थिती असेल.

या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्यक्ष स्पर्धा ५ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता सुरू होतील. स्पर्धेत कयाकिंग मध्ये K1, K2, K4 तसेच कनोईंग मध्ये C1, C2 असे २०० मी. ५०० मी. व १००० मी. या जलक्रीडा प्रकारात स्पर्धा होतील. सदर स्पर्धेचा लाभ सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी खेळाडू यांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले आहे.

05 APR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अखिल भारतीय कनोईंग, कयाकिंग स्पर्धांना सांगलीत आजपासून प्रारंभ

- उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय विद्यापीठ महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांना सांगली येथे रविवारी (दि. ५) प्रारंभ होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी ९ वाजता वसंतदादा पाटील स्मारक, कृष्णा नदी घाट येथील रॉयल बोट क्लब येथे स्पर्धेचे उद्‌घाटन होईल. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे उपस्थित राहणार आहेत. सांगलीचे आ. सुधीर गाडगीळ, महापौर धीरज सूर्यवंशी, जिल्हाधिकारी मैनक घोष, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त सत्यम गांधी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची उपस्थिती असणार आहे. स्पर्धेचा लाभ सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी खेळाडू यांनी घ्यावा, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले आहे.

## स्पर्धेत ६८९ खेळाडूंचा सहभाग

**स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्यक्ष स्पर्धा ५ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता सुरू होतील. स्पर्धेत कयाकिंग मध्ये के-१, के-२, के-४ तसेच कनोईंगमध्ये सी-१, सी-२ अशा २०० मी., ५०० मी. व १००० मी. या जल क्रीडा प्रकारांत स्पर्धा होतील.**